# संकेतस्थळावरील माहिती

विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे वाहन चालक (गट क) (वेतनश्रेणी एस - ६ (१९,९००-६३,२००) या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील नियमित पदभरतीच्या अनुषंगाने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. उपलब्ध पदसंख्या:- ०२**

**३. भरावयाच्या पदाचा सामाजिक / समांतर आरक्षणबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-**

| तपशील | अ.जा. | अ.ज. | **विजाअ** | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | **साशैमाप्र** | आदुघ | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षणाची पदे | ० | ० | **१** | ० | ० | ० | ० | ० | **१** | ० | ० | २ |

४. **वेतनश्रेणी** :- एस-६ (१९,९०० - ६३, २००)

५. **पात्रता :-**

५.१ भारतीय नागरिकत्व

५.२ वयोमर्यादा :- दि. ०१ डिसेंबर २०२४ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नाही

६. **शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि इतर आवश्यक अटी शर्ती :-**

१. शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे ;

२. मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतूदी नुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेल्या हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना धारण केलेला असणे आवश्यक आहे ;

३. शासकिय, निमशासकिय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम, प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा **तीन वर्षाहून कमी** नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे ;

४. मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे;

५. वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व चांगली शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे ;

६. संबंधित वाहन चालकास विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल, यानुषंगाने वाहनचालकास संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे (मुंबई परिसरात वास्तव्य असलेल्यांना प्राधन्य) ;

७. मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे :

८. शारीरिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक असून रातांधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधींनी ग्रस्त नसावा.

७. उमेदवाराने वाहन चालक (गट क) पदाकरिता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

८. उमेदवाराने वाहन चालक (गट क) पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या विहित नमुन्यात " उप सचिव (प्रशासन), ३ रा मजला, विस्तार इमारत, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत पाहोचेल अशा रितीने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२२ - २२७९३६१० या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर तसेच विहित नमुन्यात नसलेल्या व अनावश्यक कागदपत्र जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेला आहे.

९. वाहनचालक पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने वाहन चालविण्याची चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. सदर पदासाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात येईल. वाहन चालक पदाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे असतील. **याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरवण्यात येईल.**

## अर्जाचा नमुना

विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे वाहन चालक संवर्गाच्या पदावर नियमित नियुक्ती करण्याबाबत

उमेदवाराने पासपोर्ट साईज फोटो लावावा

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. भ्रमणध्वनी क्रमांक :-

४. जन्म दिनांक व वय :-

५. शैक्षणिक अर्हता :-

६. अनुभव :-

उपरोक्त पदावर नियमित नियुक्तीबाबत जाहिरात/ सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी

सोबत जोडावयाची कागदपत्रे :-

१. वयाचा दाखला

२. शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण

३. हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना

४. अनुभव प्रमाणपत्र

५. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र

**DGIPR/2024-2025/2802**